अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## माझा राजीनामा का घेतला? : चाकणकर यांचा सवाल

✔ सुराज्य/कोल्हापूर

मी महिला आयोगाची अध्यक्ष असताना प्रदेशाध्यक्ष म्हणून काम करू शकत नाही, या कारणाने माझा राजीनामा घेतला. गेली दीड वर्ष मी पक्षाच्या व्यासपीठापासून दूर होते. हा माझ्यावर झालेला अन्याय आहे, तो का केला गेला, असा सवाल रूपाली चाकणकर यांनी शरद पवार यांना विचारला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदी विराजमान झाल्यानंतर त्या पहिल्यांदाच कोल्हापुरात आल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष असताना मी यापूर्वी अनेकदा येथे येऊन गेले. मात्र महिला आयोगाची अध्यक्ष आणि पक्षाची महिला अध्यक्ष असताना मी येथे पहिल्यांदाच आले आहे. २०१९ ला पक्षाची महिला अध्यक्ष असताना अडीच वर्ष हा पदभार मोठ्या



ताकतीने सांभाळला. कालांतराने काही अशा गोष्टी घडल्या ज्यामुळे मला या पदाचा राजीनामा द्यावा लागला. महिला आयोगाची अध्यक्ष असताना मी प्रदेशाध्यक्ष म्हणून काम करू शकत नाही, असं म्हणून माझा राजीनामा घेतला गेला. घरावर तुळशीपत्र ठेवून वाड्यावर जाऊन लोकांमध्ये जाऊन मी संघटना वाढवली आणि त्यांनी माझा राजीनामा घेतला, असे चाकणकर म्हणाल्या.

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. ७ जुलै २०२३ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : २७८ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

# पुन्हा 'उलथापालथ'



## 'घटस्फोट' घेणार, गाशा गुंडाळणार?

## 'मातोश्री'ने घातली साद तर देवू प्रतिसाद...

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणात अजून बरीच उलथापालथ होण्याची चिन्हे दिसत आहेत. अजित पवारांना सत्तेचा आश्रय दिल्यामुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या या कृतीविषयी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटातील आमदारांमध्ये असंतोष खदखदत आहे. आमच्या वाट्याला येणारी मंत्रीपदे अजित पवार समर्थकांच्या घशात गेली.आता आम्ही सत्तेत कशाला राहायचे? अशा शब्दात शिंदे गटाच्या आमदारांचा उद्रेक दोन दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत खुद्द मुख्यमंत्र्यांना पहावा लागला. या आमदारांची समजूत काढताना शिंदे यांची त्रेधा उडाली. शिंदे गटातील काही आमदारांनी घरवापसी करण्याच्या मानसिकेत असल्याचे सांगण्यात येते. 'मातोश्री'ने साद घातली तर आम्ही प्रतिसाद देवू,असा इशारा अस्वस्थ आमदारांनी शिंदे यांना दिल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे शिंदे गट देवेंद्र फडणवीस यांच्याशी घटस्फोट घेणार असल्याचे संकेत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या ८ आमदारांना मंत्रिपदाची शपथ देण्यात आल्यामुळे शिंदे गटात नाराजीचे वातावरण असल्याची चर्चा आहे. आगामी मंत्रिमंडळ विस्तारात आपल्याला नक्की संधी मिळेल, अशी स्वप्ने रंगवत असलेल्या शिंदे गटातील आमदारांचे मनसुबे राष्ट्रवादीच्या समावेशामुळे पार धुळीला मिळाले आहेत. या पार्श्वभूमीवर आता शिंदे गटातील आमदारांचा एक गट पुन्हा उद्धव ठाकरे यांच्यासोबत जाण्याविषयी चर्चा करत असल्याचा दावा खासदार विनायक राऊत यांनी केला. ते गुरुवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. उद्धव ठाकरे यांची माफी मागून पुन्हा मातोश्रीचा आश्रय घेण्याची या आमदारांची मानसिकता झाल्याचे सांगण्यात येते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वांद्रे येथील एमईटी महाविद्यालयात आयोजित मेळाव्यात घणाघाती भाषण केले. यावेळी त्यांनी आपली मुख्यमंत्रीपदाची महत्त्वाकांक्षा स्पष्टपणे बोलून दाखवली तसेच २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस ९० जागांवर लढेल, असेही त्यांनी जाहीर केले होते. त्यामुळे शिंदे गटात प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर बुधवारी रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत वर्षा बंगल्यावर शिवसेनेचे आमदार आणि खासदारांची बैठक पार पडली. यावेळी शिंदेंनी आपल्या आमदारांसमोर एक मोठी घोषणा केली. मुख्यमंत्रीपदी मीच कायम राहणार असून २०२४ मध्ये ५० पेक्षा जास्त जागा आपल्याला लढवायच्या असल्याचा निर्धार त्यांनी बोलून दाखवला.

शिंदे गटाच्या आमदारांनी यावेळी आपल्या मनातील संताप शिंदे यांच्यापुढे व्यक्त केला. त्यावर शिंदे यांनी आपली भूमिका सविस्तरपणे मांडली. अजित पवारांना सत्तेत घेण्याचा निर्णय मला विश्वासात घेऊनच घेण्यात आला होता,असे त्यांनी प्रांजळपणे सांगितले.

### दोन आमदार भिडले?

मंत्रीपदाच्या मुद्द्यावरून दोन आमदारांत मंगळवारी सायंकाळी बाचाबाची आणि झटापट झाल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. काही आमदारांनी 'गेले वर्षभर ज्यांना मंत्रिपद उपभोगता आले, त्यांना हटवून इतरांना संधी द्या' अशी जाहीर मागणी केली. हा वाद इतका टोकाला गेला की उभयंतांमध्ये किरकोळ हाणामारी झाल्याची माहिती आहे. आमदारांमधील भांडणाचे वृत्त समजताच नागपूर दौरा अर्ध्यावर सोडून मुख्यमंत्री मुंबईत परतले. त्यांच्या उपस्थितीत 'वर्षा' बंगल्यावर आमदारांची समजूत काढण्याचे प्रयत्न बुधवारी रात्री उशिरापर्यंत सुरू होते.

### काँग्रेसचेही जशा तसे उत्तर

काँग्रेसचे आमदारही फुटणार अशी चर्चा व्हायला लागल्यानंतर काँग्रेसनेही शिंदे-भाजपा युतीला जशास तसे उत्तर दिले आहे.भाजपा नेत्या पंकजा मुंडे ह्या काँग्रेसच्या वाटेवर असून त्यांनी श्रीमती सोनिया गांधी यांची भेट घेतल्याची चर्चा आहे.त्यावर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पंकजा काँग्रेसमध्ये येणार असतील तर त्यांचे स्वागतच आहे,असे विधान केले आहे.

### आणखी एक भूकंप...



अजित पवारांच्या बंडखोरीची घटना ताजी असताना महाराष्ट्रात आणखी एक राजकीय भूकंप होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी याबाबत सूचक विधान केले आहे. महाराष्ट्रात आणखी एक गट सत्तेत येईल. काँग्रेसचे १६ ते १७ आमदार संपर्कात आहेत, असे त्यांनी एका चॅनेलच्या मुलाखतीत सांगितले.एका प्रश्नाला उत्तर देताना शिरसाट म्हणाले, काँग्रेस पक्ष फुटणार आहे, हे नक्की आहे. राज्याच्या मंत्रिमंडळाचा विस्तारही लवकर होणार आहे. त्यामध्ये शिवसेना आणि भाजपाच्या आमदारांना मंत्रिपदे दिली जातील, हेही तेवढेच सत्य आहे. काही काळानंतर काँग्रेसही आमच्याबरोबर दिसेल. काँग्रेसमधील कोणता गट शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सामील होणार? याबाबत तर्क-वितर्क लावले जात आहेत.

### टांगती तलवार...



देशाची लोकशाही भरभक्कम झाली पाहिजे. या देशात इथे-तिथे उड्या मारुन सत्तांतर घडवून लोकशाही पायदळी तुडवली जाऊ नये हे निकालातून सुप्रीम कोर्टाच्या न्यायमूर्तींनी पाहिले आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षात हा निकाल पूर्णपणे वाचल्यानंतर हे नक्की आहे की, ९० दिवसांच्या म्हणजे दिनांक ११ ऑगस्टच्या आतमध्ये फुटीर शिंदे गटाचे १६ जण हे अपात्र ठरतील. त्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणाला कुठले वळण लागेल हे आजच सांगता येत नाही,अशी कायदे तज्ञांची भविष्यवाणी आहे. पुढच्या महिन्यात १० ते ११ ऑगस्टपर्यंत एकनाथ शिंदे हे विधानसभेतून निलंबित होण्याची शक्यता आहे. ते वाचण्याची शक्यता फारच कमी आहे. शिंदेंसह १६ आमदार निलंबित झाल्यास नव्या मुख्यमंत्र्यांची गरज लागेल. त्यावेळी अजित पवार हे पुढचे मुख्यमंत्री असतील,असे भाकित चव्हाण यांनी वर्तवले आहे.

## झोपेच्या अवैध गोळ्या विक्री प्रकरणी तिघांना अटक

✔ सुराज्य/टेंभुर्णी

टेंभुर्णी शहरात सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या जानकि बेंबळे चौकातील औषधी दुकानाचे मालक अमोल चव्हाण यांच्यासह तिघांना झोपेच्या अवैध गोळया विक्रीप्रकरणी सांगली पोलिसांनी अटक केली आहे. डॉक्टरच्या परवानगी शिवाय झोपेच्या गोळयांची विक्री करणाऱ्या तिघांची साखळी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने उघडकीस आणून टेंभुर्णी, वंजावाडी, सांगली येथून तिघांना गजाआड केले आहे. यामध्ये एका औषध प्रतिनिधी व औषध दुकानदाराचा समावेश आहे. गेल्या काही दिवसापासून झोपेच्या गोळयांचा वापर नशेसाठी केला जात असल्याचे समोर आले होते त्यांच्याकडून नशेच्या गोळयांचा मुख्य स्त्रोत्र ज्ञात झाल्यावर त्यांना गजाआड करण्यात यश आल्याचे पोलीस निरीक्षक सतीश शिंदे यांनी सांगितले. अटक केलेल्यामध्ये शाहबाज उर्फ जग्वार रियाज शेख (वय २४) रा. साईनाथ नगर कर्नाळ रस्ता सांगली, सचिन सर्जेराव पाटील (वय २९) रा. वंजारवाडी ता. तासगाव आणि अमोल शहाजी चव्हाण (वय ३८ रा.टेंभुर्णी) यांचा समावेश आहे. सचिन पाटील हा औषध विक्रेता आहे तर अमोल चव्हाण यांचे औषध दुकान आहे.

## लहान भावाने केली मारहाण
## मोठ्या भावाचा आत्महत्येचा प्रयत्न

✔ सुराज्य/सोलापूर

घरगुती भांडणात लहान भावाने काठी आणि हाताने मारहाण केली. त्याच्या त्रासाला कंटाळून मोठ्या भावाने गळफास घेऊन आत्म हत्येचा प्रयत्न केला. ही घटना मुळेगाव तांडा (ता.द. सोलापूर) येथे गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. अविनाश काशिनाथ जाधव (वय ३० रा. मुळेगाव तांडा) असे जखमीचे नाव आहे . त्याला उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. गुरुवारी सकाळी आठ वाजेच्या सुमारास त्याचा लहान भाऊ प्रथमेश याने घरगुती भांडणातून अविनाश याला काठी आणि हाताने मारहाण केली होती. त्याच्या रोजच्या त्रासाला कंटाळून अविनाश जाधव याने राहत्या घरात गळफास घेतला होता . त्याला फासातून सोडवून जीवन राठोड (मेव्हणा) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले.या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## तुतारी फुंकली पण शेवटी माशी शिंकली
## ठाकरे बंधूंमधील एकी पुन्हा ठरणार मृगजळ...

✔ सुराज्य/मुंबई



शिंदे गट 'मातोश्री'च्या वाटेवर असल्याची चर्चा झडत असतानाच उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यात मनोमिलन होणार असल्याच्या बातम्या गुरूवारी राज्यभर थडकल्या. कार्यकर्त्यांनी त्या दोघांना एकत्र येण्याची तुतारी फुंकली पण नेत्यांची माशी मधेच शिंकली. त्यामुळे ठाकरे बंधूंमधील एकी पुन्हा मृगजळ ठरणार,यात शंका नाही.

अजित पवार सत्तेत गेल्यानंतर ठाकरे बंधूंच्या मनोमिलनाची चर्चा नव्याने सुरु झाली. गेल्या काही दिवसांपासून मनसेच्या कार्यकर्त्यांकडून बॅनर्स लावून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावे, अशी मागणी केली. मात्र, गुरुवारी सकाळी घडलेल्या एका घटनेमुळे ठाकरे बंधूंच्या मनोमीलनच्या चर्चेला आणखीनच बळ मिळाले. मनसेचे नेते अभिजित पानसे यांनी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांची भेट घेतली. अभिजित पानसे हे मनसेकडून युतीचा प्रस्ताव घेऊन राऊतांकडे गेले होते, अशी चर्चा आता रंगली आहे.

या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाकडून आमदार वैभव नाईक म्हणाले, याबाबतचा निर्णय उद्धव ठाकरे निश्चितच घेतील. एकत्र यायचं होतं, तर मग बाहेरच का गेलात हाही विषय आहे. संदीप देशपांडे म्हणाले, मनसे आणि उद्धव सेना यांच्यात युतीचा कोणताही प्रस्ताव आमच्याकडून देण्यात आलेला नाही. याआधी आम्ही उद्धव ठाकरे यांना युतीचा प्रस्ताव दिला होता. परंतु तेव्हा त्यांचा नकारात्मक प्रतिसाद होता. त्यामुळे आत्ता आम्ही प्रस्ताव देण्याचा विषय येत नाही.

### चर्चांना पूर्णविराम

राज ठाकरेंनी प्रस्तावाच्या चर्चांचे खंडन केले आहे. मनसेकडून ठाकरे गटाला कोणताही प्रस्ताव देण्यात आलेला नाही, अशी माहिती राज ठाकरेंनी एका चॅनेलला दिली.त्यामुळे मनोमिलनाच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे.

## तरुणाची आत्महत्या

✔ सोलापूर : इचगाव (ता.मोहोळ) येथे राहणाऱ्या विजय कैलास आठवले (वय २१) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. विजय आठवले याने सकाळी १० वाजेच्या सुमारास घरातील बेडरूम मधील अँगलला दोरीने गळफास घेतला.


## लोकांसमोर अपमान केल्याने गळफास घेत आत्महत्या

✔ सोलापूर : घराच्या परिसरात येऊन लोकांसमोर अपमान केल्याने विजय संगय्या मठपती (वय-३८, रा. विद्या नगर, शेळगी) यांनी चिठ्ठी लिहून, गळफास घेत आत्महत्या केली.

याप्रकरणी सासरा सुरेश मल्लिकार्जुन स्वामी व मेहुणा श्रीशैल सुरेश स्वामी (रा. नान्नज, ता. उत्तर सोलापूर) यांच्यावर जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. यातील मृत विजय मठपती यांना दारुचे व्यासन होते. यामुळे तो आपल्या पत्नीसोबत विभक्त राहत होता. पण दारूच्या व्यसनासाठी आरोपींनी २९ मार्च रोजी त्याला मारहाण केली. यामुळे त्याने ७ जून रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येवेळी त्याने चिठ्ठी लिहीत आत्महत्येला सासरा जबाबदार असल्याचे त्यात नमूद होते. मयताच्या पित्याने संगय्या सिदलिंगय्या मठपती (वय ६४, रा. विद्यानगर, शेळगी) यांनी फिर्याद दिली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सत्ता नसतानाही पहिल्यांदाच आनंदी वाटतं!!!

| कल्याण |
| --- |
| 168-51-146 |

| मुंबई |
| --- |
| 170-81-245 |

## भाजपाला मोठा धक्का; पाच माजी नगरसेवक बीआरएसच्या वाटेवर

## पाटील, वल्याळ, भोसले, अंबेवाले, चव्हाण, होले-पाटील यांचे राजीनामे

✔ सुराज्य/सोलापूर

**भाजपामधील 'मालकशाही' ला वैतागलेल्या भाजपाचे पाच माजी नगरसेवक आणि एका व्यापारी सेलच्या अध्यक्षांनी भाजपाच्या सदस्यत्वाचे राजिनामे दिले आहेत. या सर्वांची वाटचाल बीआरएसच्या दिशेने असल्याचे बोलेले जात आहे. पूर्व भागातील पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप यांच्यासह या माजी नगरसेवकांचा बीआरएसमध्ये जाहीर प्रवेश होण्याची शक्यता आहे. बीआरएसचे सर्वेसर्वा तथा तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी नागेश वल्याळ यांच्या निवासस्थानी भेट दिल्यानंतर या पाच नगरसेवकांची उपस्थिती बीआरएस प्रवेशाचे संकेत मिळाले होते.**

बीआरएसचे सर्वेसर्वा तथा तेलंगाणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी तब्बल ३०० गाड्यांचा ताफा घेऊन विठ्ठलाचा धावा केला होता. त्यावेळी तेलंगणाचे मुख्यमंत्री केसीआर यांनी मनी निवडणुकीचा भाव ठेऊन पूर्वभागातील दिग्गजांच्या भेटीचे नियोजन केले होते. माजी खा. धर्मण्णा सादूल, भाजपाचे माजी नगरसेवक नागेश वल्याळ यांच्या निवासस्थानी जाऊन या नेते मंडळींनी बंद खोलीत चर्चा केली होती. सोलापूरच्या विकासासाठी बीआरएस पक्षात येण्याचे आमंत्रण दिले होते.





आगामी निवडणुकीच्या तोंडावर भाजपातील अंतर्गत कलह पुन्हा चव्हाट्यावर येत आहे. भाजपातील मालकशाही आणि एकाधिकार शाहीला अनेक पदाधिकारी, नगरसेवक वैतागले आहेत. भाजपचे माजी शहराध्यक्ष प्रा. अशोक निबर्गी यांनी असाच आरोप करत काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. आता गेली पाच टर्म नगरसेवक असलेले तसेच सभागृह नेते व विरोधीपक्ष नेते पद भोगलेले आणि भाजपा माझी आई आहे, असे सांगणारे सुरेश पाटील यांच्यासह नागेश वल्याळ, संतोष भोसले, राजश्री चव्हाण, जुगनबाई अंबेवाले आणि भाजपा व्यापारी सेलचे अध्यक्ष जयंत होले-पाटील यांनी भाजपच्या सदस्यत्वाचे राजिनामे दिले आहेत. हे सर्वजण लवकरच बीआरएस पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे.

तर शिक्षण संस्थेच्या माध्यमातून पूर्व भागात पकड असणारे दशरथ गोप यांना बीआरएसची ऑफर मिळाल्यानंतर त्यांनी हैद्राबादला जाऊन मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांची भेट घेतली होती. त्यानुसार शनिवारी ९ जुलै रोजी गोप यांचा जाहीर प्रवेश होणार आहे. त्यावेळी या भाजपच्या नगरसेवकांचाही प्रवेशाचा कार्यक्रम होण्याची शक्यता आहे.

> गेल्या अनेक वर्षापासून माझ्यावर अन्याय झाला पक्षातील मालकशाहीला सर्व जण वैतागले आहेत. आता सोलापूरचा विकास डोळ्यासमोर ठेऊन राजकीय वाटचाल केली जाणार आहे. आज कार्यकर्त्यांची बैठक बोलावली आहे. बैठकीत पुढील राजकीय वाटचाल ठरवू.
>
> –नागेश वल्याळ (माजी नगरसेवक भाजपा)